# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### केज (जि.बीड) येथे कै.श्री.गोपीनाथरावजी मुंडे नाट्यगृहासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१) ३५६९६ (१७-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथे कै.श्री.गोपीनाथरावजी मुंडे नाट्यगृहासाठी शासनाने जमीन नगरविकास विभागाकडे हस्तांतरित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाट्यगृहास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, अद्याप निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नाट्यगृहासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये रुपये २.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०२३ अन्वये रुपये ५.०० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबेजोगाई यांनी प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केला नसल्याचे जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्या दिनांक २८.०६.२०२३ रोजीच्या अहवालात नमुद केले आहे.

सन २०२३-२४ मधील मंजूर अर्थसंकल्पिय निधी, प्राप्त मागण्या यांचा विचार करुन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे डिंग्रजवाडी ता. शिरुर जि. पुणे येथील गायरान गट नं. १९७ व गट नं. २३९ ही जागा पुनर्वसनासाठी राखीव ठेवण्याबाबत

**(२) ३६६०२ (१२-०१-२०२२). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे डिंग्रजवाडी (ता.शिरुर जि.पुणे) येथील गायरान गट नं. १९७ व गट नं. २३९ ही जागा चासकमान धरणग्रस्तांसाठी गावठाणाकरिता राखीव ठेवली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकमान धरणग्रस्तांना वाटप क्षेत्र पूर्ण झालेले असून इतर धरणग्रस्तांना देण्यात येवू नये अशी मागणी ग्रामपंचायत डिंग्रजवाडी यांनी केलेली असून देखील सदर गायरान जमिनी वाडा पुनर्वसनच्या गावठाणसाठी राखीव ठेवण्यात आले होते सदर दोन्ही गटामध्ये सद्या शेतजमिनीच्या स्वरुपात चासकमान सोडून इतर धरणग्रस्तांना वाटप होत असल्याचे निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत डिंग्रजवाडी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, क्रिडांगण, सोलर योजना, घनकचरा व्यवस्थापन, शाळा इत्यादी आवश्यक बाबींकरिता गायरान जागेची मागणी जिल्हाधिकारी पुणे यांना केलेली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या गटातील इतर हक्कातील पुनर्वसनासाठी राखीव धरणग्रस्तांना शेरा कमी करण्यात येवून सदर गट गायरान म्हणून ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (२६-०७-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
मौजे डिंग्रजवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) येथील गट नं. १९७ मधील जमिन चासकमान प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राखीव आहे. तर जमिन गट नं. २३९ चा ७/१२ च्या इतर हक्कात धरणग्रस्ताच्या पुनर्वसनासाठी राखीव नोंद ठेवली आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
मौजे डिंग्रजवाडी येथील गट नं. २३९ मधील क्षेत्र मलवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आलेले आहे.
(३) व (४) ग्रामपंचायत डिंग्रजवाडी यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे गायरान जनिमीची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे महापालिकेने स्वछ भारत अभियानांतर्गत स्वच्छता गृहे न बांधताच फक्त जाहिराती करून पैसे काढल्याबाबत

**(३) ३९२५८ (२५-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिकेने स्वछ भारत अभियानांतर्गत तीन वर्षापूर्वी ३० ठिकाणी वातानुकुलीत स्वच्छता गृहे बांधण्याचे नियोजन केलेले असून त्यांचा ठेका सुद्धा ठेकेदाराला दिला होता परंतु ठेकेदाराने स्वच्छता गृहे न बांधताच फक्त जाहिराती करून पैसे काढल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने महापालिकेने ठेकेदाराला कारवाईसाठी नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार महापालिकेकडून स्वच्छता गृहे न बांधणाऱ्या ठेकेदारावर नोटीसीच्या अनुषंगाने कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०८-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
स्वच्छ भारत अभियानांतर्गत महानगरपालिका क्षेत्रामध्ये वातानुकुलीत स्वच्छता गृहे बांधकामाचे कंत्राट देण्यात आलेल्या ठेकेदारामार्फत १० शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते. परंतू सदर शौचालय नागरीकांकरीता खुली करण्यात आली नसल्याने महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणी ठेकेदारास नोटीस बजाविण्यात आली होती.
(२) व (३) महानगरपालिकेमार्फत ठेकेदारास नोटीस बजाविल्यानंतर ठेकेदारामार्फत बांधण्यात आलेली १० ठिकाणचे शौचालय नागरिकांच्या वापरासाठी खुली करण्यात आली असल्याने पुढील कार्यवाही करण्यात आली नसल्याचे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ शहरातील नगर परिषद परिसरातील आझाद मैदान मध्ये असलेल्या नेहरु उद्यानातील भव्य तारांगण सुरु करण्याबाबत

**(४) ४३५६१ (२५-०४-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात नाविन्यपुर्ण योजनेतंर्गत यवतमाळ नगर परिषदेच्या ताब्यात असलेल्या आझाद मैदान येथील नेहरु उद्यान येथे तारांगणाचे बांधकाम व एडवेंचर पार्कच्या बांधकामास दि. २६/०३/२०१८ रोजी जा.क्र.जिवायो/ना.पु.यो./आदेश/कावि २६८/२०१८ रोजी रु.३४५.७१ लाख रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तारांगणाचे काम पुर्ण होवून एक वर्षाचा कालावधी लोटून ही अद्याप पर्यंत मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी तारांगण सुरु केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तारांगण निर्मीती करणाऱ्या कंत्राटदार श्री.देशमुख यांनी नगर परिषद यांना प्रशिक्षण देण्याकरीता वारंवार पत्र व्यवहार करुनही नगरपरिषदेकडून त्यांच्या पत्रास प्रतिसाद देत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पावर ३४५.७१ लक्ष रुपये खर्च करुन नवीन पिढीला खगोली ज्ञान मिळेल, मात्र, मुख्याधिकारी नगर परिषदेच्या आठमुठी धोरणामुळे सदर प्रकल्प तांत्रिक अडचणीमुळे शोभेची वास्तु ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तारांगण सुरु करण्याबाबत जिल्हा नियोजन समिती अंतर्गत जिल्हा नियोजन अधिकाऱ्यामार्फत दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी बैठक घेण्यात आली असून, सदर बैठकीमध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी १ महिन्याचे आत तारांगण सुरु करण्याचे आश्वासन दिले होते, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, खगोलीय घटना व विज्ञानाचे सिध्दांत मांडण्यात शाळेकरी विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्याकरीता तारांगण सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

दिनांक २/१०/२०२१ रोजी मा.पालकमंत्री यवतमाळ यांच्या हस्ते तारांगणाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला असून तारांगणाचे शो दिनांक २६/२/२०२२ पासून नियमित सुरु आहेत. कंत्राटदारामार्फत नगरपरिषद कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथील परिसरातील व गावांमध्ये अद्ययावत अभ्यासिकेचे बांधकाम करण्याबाबत

**(५) ४३९२४ (२५-०४-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) येथील परिसरातील व गावांमध्ये अनेक विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी येत असून स्पर्धा परीक्षा किंवा इतर शैक्षणिक तत्सम परीक्षेच्या अभ्यासाकरिता अभ्यासिका नसल्याने त्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगर विकास विभागाच्या नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत कल्याण पश्चिम येथे सदर अद्ययावत अभ्यासिकेचे बांधकाम केल्यास येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण (पश्चिम) येथे अद्ययावत अभ्यासिकेचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०२३) :** (१) महानगरपालिकेने सन २०११ मध्ये स्व.प्रकाश परांजपे स्पर्धा परिक्षा केंद्र सुरु करुन ते कै.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास चालविण्यास दिले असून कोव्हिड-१९ साथरोग प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेस सदर केंद्र सुरू ठेवता आले नव्हते. तथापि, सदर स्पर्धा परीक्षा केंद्र पुन्हा एप्रिल, २०२२ मध्ये सुरु करण्यात आलेले असून विद्यार्थ्यांना त्यांचा चांगला लाभ होत आहे.
(२) व (३) महाराष्ट्र शासनाने महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांचा विकास या योजनेंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ग्रंथालय / अभ्यासिका बांधण्यासाठी रू.५० लक्ष निधी मंजूर केला असून त्याचे जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले आहे.
तसेच कल्याण (पश्चिम) भागातील मौजे वाडेघर येथील सर्वसमावेशक आरक्षणांतर्गत महापालिकेच्या ताब्यात आलेल्या पुण्योदय पार्क येथील वाचनालयाच्या जागेत अभ्यासिका बनविण्याच्या दृष्टीने कामे पूर्ण करण्यात आली असून लवकरच ते सुरू करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील महत्वाच्या मार्गांवर सार्वजनिक शौचालयांची उभारणी करण्याबाबत

**(६) ४४६२१ (२०-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील महत्वाच्या मार्गांवर मोजक्या ठिकाणी सार्वजनिक शौचालय असून ती देखील सुस्थितीत नसल्यामुळे मुंबईतील नागरिकांना याचा खुपच त्रास सहन करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिम द्रुतगती मार्ग वांद्रे ते दहिसर पर्यंत केवळ २ ते ३ ठिकाणी शौचालय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील महत्वाच्या मार्गांवर काही टप्प्यांवर प्रवाशांकरिता विशेषतः महिला व अपंग प्रवाशांकरिता स्वच्छ अशा सार्वजनिक शौचालयांची गरज असून त्यांच्या उभारणीबाबत महानगरपालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन मुंबईतील प्रमुख मार्गांवर स्वच्छ असे सार्वजनिक शौचालय तातडीने उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सद्यस्थितीत पश्चिम द्रुतगती महामार्गावर सहा ठिकाणी "पैसे द्या व वापरा" तत्वावर सार्वजनिक शौचालयाची सुविधा महानगरपालिकेतर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावर घाटकोपर उड्डाण पुलाजवळ, घाटकोपर नाल्याजवळ, विक्रोळी उड्डाण पुलाजवळ महीला व अंपग प्रवाशांसह सर्व प्रवाशांसाठी तीन सुविधा प्रसाधनगृहे उभारण्यात आलेली आहेत. पश्चिम द्रुतगती महामार्गावर पुर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजुस एकूण २८ ठिकाणी शौचालय आहेत.
मुंबईतील महत्वाच्या मार्गावर प्रवाशांसाठी सार्वजनिक शौचालयाच्या सुविधांची वाढ करण्याकरीता महानगरपालिका प्राधान्याने प्रयत्न करीत आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील गैरकारभाराबाबत

**(७) ४५३७४ (१६-०९-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात अत्यंत अनागोंधी कारभार सुरु असून कर्मचारी कार्यालयात नियमित उपस्थित रहात नसणे तसेच उशिरा कार्यालयात येऊन लवकर जात असल्याने येथील अनेक कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नागरीकांना त्यांच्या ७ दिवसात होणाऱ्या कामासाठी तब्बल ३ ते ४ महिने प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन अधिकाऱ्यांना सहकार्य करण्यासाठी ०४ मोटार वाहन निरीक्षक, ०८ सहायक मोटार वाहन निरीक्षक, कार्यालयीन कामासाठी ०५ ते ०६ लिपिक व अधिकाऱ्यांना क्षेत्राअंतर्गत फिरण्यासाठी एक कायमस्वरूपी व एका कंत्राटी वाहन चालकाची नियुक्ती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, येथील मोटार वाहन निरीक्षक हे कंत्राटी वाहन चालकामार्फत महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवैध वसुली करीत असल्याने त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.परिवहन मंत्री यांच्याकडे दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०८-२०२३) :** (१) व (२) नाही.

(३) होय.

(४) याबाबत शासन तसेच परिवहन आयुक्त कार्यालय यांचेकडे विषयांकित निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, अशा आशयाची बातमी स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दि. ०६.०६.२०२२ रोजी प्रसिध्द झाली आहे.

(५) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई यांच्या अहवालानुसार, त्यांच्या कार्यालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या वायुवेग पथकामध्ये वाहन चालकांची आवश्यकतेनुसार आळीपाळीने नियुक्ती करण्यात येते. तथापि महामार्गावर या वाहन चालकांमार्फत अवैध वसूली करण्यात येत नाही.

(६) लागू नाही.

---

### औरंगाबाद महानगरपालिके मधील मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत

**(८) ४७०२९ (३०-१०-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगर पालिकेमधील मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद विहित पध्दतीने भरण्यासाठी नगरविकास विभागाने दिनांक २० फेब्रुवारी, २००९ रोजी वा त्यासुमारास परवानगी दिल्यानंतर श्री.संजय पवार हे त्या पदासाठी पात्र असतांना देखील महानगरपालिकेतील पदोन्नतीपासून त्यांना वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.संजय पवार यांना पदोन्नतीपासुन वंचित ठेवल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक २८५९/२०१४ नुसार श्री.पवार यांना सहा महिन्याच्या आत पदोन्नती देण्याचे निर्देश दिले असताना शासनाने प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठविलेला असल्यामुळे श्री.पवार यांना पदोन्नती समितीने पदोन्नती पासून डावलले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पदोन्नतीवरील अधिकारी परत गेल्यानंतरही श्री.पवार यांना पदोन्नती देण्यात आली नसून तसेच त्यांच्या पदोन्नती प्रकरणात वित्त विभागातील उपसचिव यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या मानहानी प्रकरणी शपथपत्रात माफिनामा दाखल केल्यानंतरही शासनाच्या वित्त विभागाकडून औरंगाबाद महानगरपालिकेत वारंवार प्रतिनियुक्तीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर अधिकारी पाठविले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.पवार हे मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदासाठी सर्व प्रकारच्या अर्हता आणि अनुभव धारण करीत असताना तसेच मा.उच्च न्यायालयाचे दोन याचिका मधील निर्णयामध्ये त्यांना पदोन्नतीचे निर्देश दिले असतांना सुध्दा औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांना नियमित पदोन्नती देण्याऐवजी तदर्थ पदोन्नती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास पात्र अधिकाऱ्यास सन २००९ पासून पदोन्नतीपासून वंचित ठेवणे व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाकडे दुर्लक्ष करणे ही बाब न्यायालयाचा अवमान करणारी असल्याने संबंधित दोषी अधिकाऱ्याविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,

प्रारुप नियम (Model Recruitment Rules) मधील नियमानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाकरिता विहीत केलेली अर्हता व पध्दती स्विकारुन पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र, नगर विकास विभाग, दिनांक २० फेब्रुवारी,२००९ अन्वये महानगरपालिकेला कळविण्यात आले होते.
(२) हे खरे नाही,

दिनांक २६.८.२०२१ रोजी राज्य शासनाची मान्यता प्राप्त झालेल्या सेवाप्रवेश नियमानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे असल्याने सदर पदावर राज्य शासनाने प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेले श्री.अशोक थोरात कार्यरत होते. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५४(१) अन्वये दि.१२.१.२०१५ रोजी संपन्न झालेल्या कर्मचारी निवड समितीने "श्री.पवार यांना या पदावर पदोन्नती देण्यासाठी पद रिक्त नसल्याने त्यांचा या पदावर पदोन्नतीकरिता विचार करण्यात आला नाही" असे, महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे नाही,

महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग एक-मध्य उप-विभाग, दि.२३.५.२०१८ नुसार मुख्य लेखाधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद विहित केली आहे. तद्नंतर, औरंगाबाद महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२१ मध्ये नमूद केल्यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पद १०० टक्के महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सह/उप संचालक (लेखा) या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतूद विहित केली आहे.
(४) हे खरे नाही,

मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने अधिकारी उपलब्ध न झाल्याने श्री.पवार यांना महानगरपालिकेच्या स्तरावर पदोन्नती देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दिनांक ३०.४.२०२१ रोजी घेण्यात आलेली होती. सदर समितीने घेतलेल्या खालील निर्णयानुसार, "शासनाकडून मुख्य लेखाधिकारी या पदावर शासनाकडील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तने नियुक्ती केल्यास, श्री.संजय पवार यांना लेखाधिकारी पदावर पदावनत करण्यात येईल व याबाबत त्यांना कुठल्याही प्रकारे न्यायालयात दाद मागता येणार नाही", या व इतर अटींच्या अधिन राहून त्यांना मुख्य लेखाधिकारी या पदावर तदर्थ (Adhoc) पदोन्नती देण्यात आलेली होती, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नगरपरिषद नांदुरा (जि.बुलढाणा) अंतर्गत हद्दवाढ झालेल्या भागाच्या विकासासाठी निधी उपलब्ध होणेबाबत

**(९) ४७७६१ (२८-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा नगर परिषद (जि.बुलढाणा) येथील सन २०१६ मध्ये हद्दवाढ झालेल्या भागातील विकास कामाकरीता सन २०२१-२२ आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय निधी, प्रत्यक्ष वितरणासाठी उपलब्ध होणारा निधी व मागण्या यांच्या अधिनतेने निधी वितरणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, निधी वितरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आह
(२) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील निधी इतर नगरपरिषदांना वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरपंचायत पाटोदा (जि.बीड) येथील माजरा नदीवर पुल कम बंधारा बांधकामाची चौकशी करण्याबाबत

**(१०) ४८०८९ (२८-०९-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरपंचायत पाटोदा (जि.बीड) येथील माजरा नदीवर पुल व बंधारा बांधकाम करणे या कामाची चौकशी करणेबाबत नगरविकास विभागाने दिनांक २४ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचानालय, मुंबई यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून, चौकशी अहवालानुसार पाटोदा नगरपंचायतीमार्फत दि.१६ नोव्हेंबर, २०२२ रोजी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी निराधार योजनेसाठी घटस्फोटीत महिलांकडून कागदपत्रे स्विकारली जात नसल्याबाबत

**(११) ४८५१४ (२३-०५-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी निराधार योजनेसाठी घटस्फोटीत महिलांकडून स्टॅम्प, पेपर नोटरी इत्यादी कागदपत्रे स्वीकारली जात नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विषयी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तहसीलदार भिवंडी, यांचेकडे दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) शासन निर्णय दि.२०.०८.२०१९ मधील तरतुदींनुसार लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात येते. सदर बाब जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्याकडून मा.लोकप्रतिनिधींना दि.१९.०७.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

**नांदेड-लातूर रेल्वेमार्गाच्या प्रस्तावाबाबत**

**(१२) ४९३९८ (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नांदेड-लातूर रेल्वेमार्गाच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रस्ताव पाठविला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) लातूर ते नांदेड थेट विद्युतीकरणासह नविन ब्रॉड गेज रेल्वे मार्ग प्रकल्पाबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) नगरपरिषद हद्दीमधील नगरपरिषदेकडून करण्यात आलेली रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केल्याबाबत**

**(१३) ४९४१५ (१०-११-२०२२). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीमधील नगरपरिषदेकडून होत असल्याची रस्त्यांची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) सन २०२२ या आर्थिक वर्षात रस्त्यांच्या कामांचे दक्षता गुणनियंत्रण विभाग, अहमदनगर यांच्याकडून साहित्य चाचणी करण्यात आली आहे. तसेच सदर कामांचे त्रयस्त तांत्रिक लेखापरिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांच्याकडून करुन घेण्यात आले असून, काम समाधानकारक असल्याबाबतचा अहवाल दिला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीड (बीड ग्रामीण) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय येथे बनावट कागदपत्राच्या आधारे वाहनांची पुन:नोंदणी केल्याबाबत**

**(१४) ५११७७ (२२-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (बीड ग्रामीण) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय येथे अरूणाचल राज्यातील बनावट कागदपत्राच्या आधारे वाहनांची पुर्ननोंदणी केल्याप्रकरणी दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास कलम १२० (ब, ३४, ४०९, ४२०, ४६७, ४८८, ४७१) अन्वये फौजदारी गुन्हा दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी देखील असे गैरप्रकार झाल्यामुळे मागील दोन वर्षाच्या कालावधी मधील वाहनांची नोंदणी व हस्तांतर कागदपत्राची तपासणी करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तसेच बनावट कागदपत्राच्या आधारे वाहनांची पुर्ननोंदणी होऊ नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०८-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांचे दि. १०.०५.२०२२ च्या आदेशान्वये विशेष पथकामार्फत सन २०१९ ते मे, २०२२ या कालावधीचे अंतर्गत लेखा परिक्षण केले आहे. तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहनांची पुर्ननोंदणी होऊ नये या करिता परिपत्रक क्र. एमव्हीआर ०२०५/ सीआर१७४/का.२४/ जा.क्र. ११७९६ दि. १०.०७.२००६ अन्वये सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणी प्रथमदर्शी दोषी आढळलेल्या श्रीमती सुरेखा डेडवाल, वरिष्ठ लिपिक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.
या वाहन नोंदणी प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्याचा अहवाल शासनास सत्वर सादर करण्याबाबत शासनस्तरावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागास कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माजलगाव नगरपरिषद ( जि.बीड) चे विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत**

**(१५) ५१३३४ (२२-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगाव नगरपरिषद (जि.बीड) चे सन २०१७ ते २०२२ या कालावधीचे विशेष लेखा परीक्षण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दिनांक १७ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, संचालनालय स्थानिक निधी लेखा परीक्षण, महाराष्ट्र राज्य कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या पत्रात तीन महिन्यात विशेष लेखापरिक्षण करण्याचे नमुद करण्यात आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर नगर परिषदेचे विशेष लेखापरिक्षण पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) माजलगाव नगरपरिषदेचा विशेष लेखा परिक्षणाबाबतचा प्रस्ताव वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.३० मे, २०१७ नुसार सक्षम प्राधिकाऱ्यांद्वारे पाठविण्याबाबत स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालयाने त्यांच्या दि.२० फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळविले होते. परंतु, अद्यापही माजलगाव नगरपरिषदेचे सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीचे जमा खर्चाचे विशेष लेखापरिक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड अथवा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-अहमदाबाद दरम्यानच्या प्रस्तावित बुलेट ट्रेनकरिता राज्यावर अधिक आर्थिक भार पडत असल्याबाबत

**(१६) ५२२०८ (२७-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद दरम्यानच्या प्रस्तावित बुलेट ट्रेनकरिता गुजरात राज्यातील जवळपास ९४० हेक्टर तर महाराष्ट्रातील जवळपास ४३१ हेक्टर जमिन संपादित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रापेक्षा गुजरात राज्यातील अधिक जमिन या प्रकल्पाकरिता संपादित करण्यात येणार असताना महाराष्ट्र राज्यावर या प्रकल्पाकरिता गुजरात राज्याइतकाच म्हणजेच प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के खर्च करण्यास राज्य शासनाने मंजूरी दिली आहे त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाकरिता जपानच्या जयकाकडून ८० टक्के रक्कम कर्ज म्हणून घेण्यात येणार असून सदरहू प्रकल्पामुळे राज्यात कोणती विकासकामे होणार आहेत,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाकरिता ज्या प्रमाणात जमिन अधिग्रहीत करण्यात येणार आहे त्याचप्रमाणात खर्च करण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) होय.

(२) या प्रकल्पामध्ये केंद्र शासनाचे ५० टक्के, गुजरात राज्याचे २५ टक्के व महाराष्ट्र राज्याचे २५ टक्के भागभांडवल राहिल असा निर्णय दिनांक १२.०९.२०१७ रोजी घेण्यात आला आहे.

(३) रेल्वे प्रकल्पातील चार रेल्वे स्थानके महाराष्ट्र राज्यात उभारली जाणार आहेत. या प्रकल्पाच्या कामामुळे राज्यात खुप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मीतीची शक्यता आहे.

(४) सदर प्रकल्पामध्ये केंद्र शासनाचे ५० टक्के, गुजरात राज्याचे २५ टक्के व महाराष्ट्र राज्याचे २५ टक्के भागभांडवल राहिल असा निर्णय शासन मान्यतेने दिनांक १२.०९.२०१७ रोजी घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील नगरपरिषदेच्या बागेच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(१७) ५३४०१ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोबाई (जि.बीड) येथील नगर परिषद हद्दीतील सर्व्हे क्र.५९७ व ६१२ मधील जमिनीमध्ये अभिन्यास मंजूर करुन नगरपरिषदेने लिलाव (हर्रासी) करुन विक्री केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्व्हे नंबर ५९७ मधील उत्तर पुर्व कोपऱ्यामध्ये नगरपरिषदेने बागेसाठी आरक्षण ठेवण्यात आले असता, उक्त आरक्षित जागेवर अलिशान हॉटेल्स व दुकानांचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.सुनील लोमटे, श्री.दिलीप सांगळे, श्री.शेख रहीम शेख रज्जाक यांनी जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी, नगरपरिषद अंबाजोगाई यांच्याकडे निवेदनान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त प्रकरणी नगरपरिषदेच्या बागेसाठी आरक्षण असतांना त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम करण्यात आल्यामुळे संबधितांवर कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे,

सदर जमिनीवरील भूखंड नगरपरिषदेने सन १९६३ साली लिलाव करुन विक्री केले आहेत, ही बाब खरी आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) हे खरे नाही,

अंबाजोगाई नगरपरिषदेचा सन १९७६ व त्यानंतर जे विकास आराखडे मंजूर झालेले आहेत. त्यापैकी कोणत्याही मंजुर विकास आराखड्यामध्ये सर्वे क्र.५९७ व सर्वे क्र.६१२ येथे बगीचासाठी कोणतेही आरक्षण असल्याचे दिसून येत नाही. सदर जागा रहिवास प्रयोजनासाठी आरक्षित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहर पाणीपुरवठयाची नविन जलवाहिनी टाकण्याची योजना शासन स्तरावर प्रलंबित असल्याबाबत

**(१८) ५४७९८ (२७-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहर पाणीपुरवठयाची २,४०० कोटी योजनेचे काम दोन ते अडीच वर्षात पूर्ण होणे शक्य नसल्याने जुनी ७०० मिलीमीटर व्यासाची जलवाहिनी पुनरुज्जीवीत करण्यासाठी १९३ कोटीतून ९०० मिलिमीटर व्यासाची नविन जलवाहिनी टाकण्याची योजना शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेस विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू योजना तातडीने पूर्णत्वास नेण्याकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत औरंगाबाद शहराच्या रुपये २७४०.७५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रद्द झालेल्या कामाचे अदा केलेले देयक वसूल करण्यास दिलेली स्थगिती उठविण्याबाबत

**(१९) ५५०९५ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे या योजनेतंर्गत सन २०१६ मध्ये एक कोटी ८ लाख रुपयांची कामे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामामध्ये निकृष्ट दर्जाचे वाळू, माती, स्टील, खडी तसेच सिमेंट वापरले असल्याचा अहवाल बाजार समितीचे सल्लागार अभियंता, श्री.शेख इसरार व प्रकल्प इंजिनिअर, श्री.बगडी यांनी दिला असून केलेले काम प्रकल्पाच्या गुणवत्ता धोरण व मानांकनाप्रमाणे झाले नसल्याने महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP), पुणे यांनी सदर काम रद्द केले आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी निकृष्ट दर्जाचे केलेले काम रद्द केल्यानंतर देखील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निधीतून देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रारी / उपोषण केल्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर कामात पणन संचालक, पुणे यांच्या अटी व शर्तींचे उल्लंघन करुन निकृष्ट कामाचे बाजार समितीने अदा केलेल्या देयकाची रक्कम रु.३६,३९,०३९/- ही संबंधितांकडून वसूल करुन बाजार खात्यात सात दिवसांच्या आत भरण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालीन पणन मंत्री महोदयांनी सदर आदेशाला दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी स्थगिती दिली असताना, सदर स्थगिती जिल्हा उपनिबंधक यांच्या आदेशान्वये कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पणन मंत्री यांच्याकडे दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी स्थगिती उठवून संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करुन त्यांच्याकडून किती रक्कम वसूल केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पांतर्गत बाजार समितीच्या पायाभूत सुविधेच्या विकास करण्यासाठी बाजार समितीस ५० टक्के अनुदानावर विकास कामे करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती अंबाजोगाई, जि. बीड या बाजार समितीची निवड झालेली होती. त्यानुसार बाजार समितीने पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबवली होती व मे. एस. बी. देशमुख, देवपुर, धुळे या कंत्राटदारास काम देण्यात आले होते.

(२) हे खरे आहे.

श्री. नंदकिशोर मुंदडा यांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजीच्या अर्जान्वये बाजार समितीच्या मार्केट यार्डात चालू असलेले रोडचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याने सदर काम रद्द न केल्यास आमरण उपोषण करणेबाबत तक्रार अर्ज केलेला होता. त्यानुषंगाने नोडल अधिकारी पीआययू (कृषि पणन) महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे यांनी प्रकल्पाच्या आदर्श गुणवत्ता धोरणानूसार व आवश्यक तांत्रिक मानकाप्रमाणे काम न झाल्यामुळे आणि तक्रार अर्जाच्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीने कोणताही खुलासा सादर न केल्यामुळे कृषि उत्पन्न बाजार समिती, अंबाजोगाई यांची निवड रद्द करुन बाजार समितीस कोणतेही अनुदान देय होणार नाही, असे दिनांक २४.१०.२०१८ रोजी कळविले होते.

(३) हे खरे आहे.

पणन संचालक, पुणे यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याबाबत जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना दिनांक ८.०६.२०२० रोजी कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग -१ सहकारी संस्था, बीड यांचेंमार्फत चौकशी करण्यात आली. सदर रस्ता कामाचे मुल्याकंनाप्रमाणे रु.३६,३९,०३९/- एवढी रक्कम कंत्राटदारास अदा करण्याची शिफारस केली.

त्यानुसार पणन संचालक यांनी दि.२६.७.२०२१ रोजीच्या आदेशान्वये अटींच्या अधीन राहून कंत्राटदारास देयक अदा करण्यास परवानगी दिली.

(४) हे खरे आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अंबाजोगाई यांची महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० अन्वये चौकशी करण्यासाठी दि. २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी नियुक्ती केली.

सदर नियुक्तीप्रमाणे त्यांनी चौकशी करुन दि. २८ ऑक्टोबर, २०२१ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालाचे अवलोकन केले असता या कार्यालयाचे दि. २६ जुलै, २०२१ रोजीचे पत्रातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन सदर रस्ता कामाचे देयक अदा केले असल्याचे नमूद केले असून बाजार समितीस महाराष्ट्र कृषि उत्पन्न

खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४० (ई) अन्वये निर्देश देणेबाबत चौकशी अहवालात नमूद केले आहे.

सदर चौकशी अहवालाचे अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी दि. ३० ऑक्टोबर, २०२१ रोजी बाजार समितीस पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्रातील अटी शर्तीचे उल्लंघन करुन अदा केलेल्या देयकाची रक्कम रु.३६,३९,०३९/- ही संबंधिताकडून वसुल करुन बाजार समितीच्या बँक खात्यात सुटीचे दिवस वगळून सात दिवसाचे आत भरणा करणेबाबत कलम ४० (ई) अन्वये निर्देश दिलेले आहे. सदर निर्देशाविरुध्द बाजार समितीने शासनाकडे पुनरिक्षण अर्ज क्र. ३६/२०२१ दाखल केलेला असून सदर प्रकरणी शासनाने दि.११ नोव्हेंबर, २०२१ अन्वये पुढील आदेशापर्यंत स्थगीती दिलेली आहे.

(५) व (६) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी वेळोवेळी चौकशी करून सदर प्रकरणी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० ई अन्वये बाजार समितीने अदा केलेले बील रक्कम रू.३६,३९,०३९/- वसूल करून बाजार समितीचे बँक खात्यामध्ये भरणा करणेबाबत दि. ३० ऑक्टोबर २०२१ रोजी निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाविरूध्द बाजार समितीने शासनाकडे पुर्ननिरीक्षण अर्ज क्र.३६/२०२१ दाखल केला असून सदर प्रकरणी शासनाने दि.११ नोव्हेंबर २०२१ अन्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिलेली असून सदर प्रकरण शासन स्तरावर न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी सुनावणी होऊन न्यायोचित निर्णय घेण्यात येईल.

---

**नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत तसेच बाह्य रिंगचे प्रस्ताव तयार करुन कामांना गती देण्याबाबत**

**(२०) ५६७२० (०९-०५-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरातील अंतर्गत तसेच बाह्य रिंगचे प्रस्ताव तयार करून या कामांना गती देण्याचे नाशिक महानगरपालिकेला मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळा अडीच वर्षावर येवून ठेपल्यामुळे सिंहस्थ कुंभमेळयासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रशासकीय मान्यता, निधीची उपलब्धता करून कुंभमेळ्यापूर्वी कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक महानगरपालिका क्षेत्रात सन २०२७-२०२८ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा निमित्त महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत करावयाच्या पुर्व तयारीची कामे, विविध कामांचे आराखडा तयार करणे, आराखडयानुसार नियोजन, अंमलबजावणी करणे, उपाय योजना करणे, वेळोवेळी कामांचा आढावा घेणे इत्यादी करीता सर्व विभागांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. त्यासाठी मनपा स्तरावर अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. मनपा स्तरावरील सिंहस्थ कुंभमेळा समन्वय समितीच्या २ बैठका घेण्यात आल्या आहेत.

तसेच विविध विभागांच्या कामांसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, गरजेनुसार प्रेझेंटेशन तयार करणे, प्रगती अहवाल तयार करणे आदींसाठी सल्लागार संस्था नेमणुकीची प्रक्रिया मनपा मार्फत लवकरच पुर्ण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगर पंचायत, वडवणी (जि.बीड) च्या विशेष लेखापरिक्षणा संदर्भातील अहवालाबाबत**

**(२१) ५७३२२ (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर पंचायत, वडवणी (जि.बीड) चे सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण संदर्भात शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडुन वस्तुनिष्ठ अहवाल मागवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून शासनास अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने, चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.१३.०६.२०२३ रोजीच्या आदेशान्वये उप विभागीय अधिकारी, माजलगाव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील एमएनजीएल या कंपनीने सीएनजी व एलपीजी गॅस लाईन टाकतांना शहरातील रस्ते खोदल्याबाबत**

**(२२) ५७७६२ (२४-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील एमएनजीएल या कंपनीने सीएनजी व एलपीजी गॅस लाईन टाकतांना शहरातील चांगले पक्के रस्ते खोदून ठेवल्याने शहराचे मोठ्या प्रमाणात विद्रुपीकरण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शहरातील पक्के रस्ते खोदून ठेवल्याने नाशिककरांनी कर रुपाने भरलेल्या महसूलाचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शहरातील पक्के रस्त्यांचे खोदकाम करण्यासाठी दंड स्वरुपात सदर कंपनीने नाशिक महानगरपालिकेत महसूल भरला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषी आढळून आलेल्या कंपनीवर व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

एमएनजीएल या कंपनीस फक्त त्यांची पाईपलाईन ज्या ठिकाणी टाकली आहे त्या ठिकाणी रस्ता खोदण्याची नाशिक मनपाने परवानगी दिली आहे.

(२), (३) व (४) महानगरपालिका हद्दीमध्ये विविध भुमिगत सेवा वाहिन्या टाकण्याकरीता विविध संस्था / कंपन्याना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २३९ नुसार विविध भुमिगत सेवा वाहिन्या टाकणेसाठी रस्ता खोदण्यास परवानगी देण्यात येते. विविध संस्था / कंपन्यांना त्यांच्या विविध सेवा वाहिन्या टाकणेकरीता रस्ता फोडणेची परवानगी देतांना शासन परिपत्रकानुसार नाशिक महानगरपालिकेने निश्चित केलेले रोड डॅमेज चार्जेस आकारण्यात येतात.

नाशिक शहरात भुमिगत गॅस पाईप लाईन टाकणेकरीता महाराष्ट्र नॅचरल गॅस लि. यांनी ज्या भागात पाईप लाईन टाकण्याची मागणी केली आहे. त्याच भागात रस्ता खोदण्याची परवानगी दिली जाते. संबंधित कंपनीकडून रोड डॅमेज फी वसुल करण्यात आल्याने खोदलेले रस्ते नाशिक मनपा मार्फत पुर्ववत / दुरुस्त करण्यात येतात. त्यामुळे शहरात

विद्रुपीकरण झाल्याचा प्रश्न उदभवत नाही. तसेच महाराष्ट्र नॅचरल गॅस लि यांचेकडून रोड डॅमेज चार्जेस वसुल करण्यात आल्याने नाशिककरांनी कर रुपाने भरलेला महसुलाचा कोणताही अपव्यय झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेची विस्तारीत पाणी पुरवठा योजना पुर्ण करण्याबाबत**

**(२३) ५८३२९ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेची विस्तारीत पाणी पुरवठा योजना अद्यापही पूर्ण न झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासन स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अपूर्णावस्थेत असलेली पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०८-२०२३) :** (१), (२), (३) व ४) वरोरा नगर परिषदेने शहराची वाढीव लोकसंख्या विचारात घेऊन विस्तारित पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. नगर परिषदेमार्फत जलसंपदा विभागाकडून पाणी आरक्षण मिळवण्याची कार्यवाही सुरु असून ते मिळाल्यानंतर प्रकल्प मंजुरी विषयक आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील मनपा अंतर्गत सुरु असलेल्या अमृत योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२४) ५८३४५ (२४-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील महानगरपालिकेअंतर्गत सुरु असलेल्या अमृत योजनेचे काम पुर्ण न झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना पुर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन योजना पुर्ण करण्याबाबत तसेच योजना पुर्ण न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर चंद्रपूर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर चंद्रपूर शहरातील सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्पाचे काम ९० टक्के पुर्ण झालेले आहे.

(२) चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाकरिता वन विभाग, महाऔष्णिक विद्युत केंद्र, सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे विभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग अशा विविध विभागांच्या परवानग्या मिळण्यास विलंब तसेच, कोव्हीड महामारीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे.

तसेच, सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पाचे सन २०२१ मध्ये कार्यादेश देण्यात आले असून सदर प्रकल्प विहित मुदतीत पूर्ण करण्याचे महानिर्मितीचे नियोजन आहे.

(३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणी पुरवठा व सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पांपैकी पाणी पुरवठा प्रकल्पाची बहुतांश कामे पूर्ण झालेली असून प्रकल्पाची भौतिक प्रगती ९५ टक्के झालेली आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने झोन निहाय कामे पूर्ण करून चाचणी घेण्यात येत आहे व टप्प्याटप्प्याने झोनचा पाणीपुरवठा सुरु करण्यात येत आहे. आजमितीस प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. तसेच स्थापत्य कामाचे कंत्राटदाराने काम विहीत मुदतीत पूर्ण न केल्यामुळे दंडात्मक कारवाई चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

चंद्रपूर शहराच्या सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पाचे कार्यादेश सन २०२१ मध्ये देण्यात आले असून आजतागायत प्रकल्पाची भौतिक प्रगती ९० टक्के झालेली असून सदर प्रकल्प विहित कालमर्यादेत पूर्ण करून कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

---

## भुसावळ (जि.जळगाव) शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी पिण्यायोग्य करण्यासाठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाबाबत

**(२५) ५८६४१ (२४-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरातील सांडपाणी नाल्याच्या माध्यमातून तापी नदीमध्ये सोडण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी वापरायोग्य करण्यासाठी भुसावळ नगरपालिकेने अमृत योजना-२ मध्ये रुपये ३७८ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मलजल प्रकल्पाचे स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्प पुर्णत्वास आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यासा, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

भुसावळ नगरपरिषदेमार्फत दरवर्षी सर्व नाल्यांची साफसफाई करण्यात येते तसेच त्याअंतर्गत गाळ/कचरा नदीमध्ये जाण्यास अटकाव करण्यात येत असून पर्यायाने नदी प्रदूषण टाळण्याचे पर्यंत भुसावळ नगरपरिषदमार्फत करण्यात येतात.

(२) भुसावळ नगरपरिषदमार्फत केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत मलनिस्सारण प्रकल्पाचा रुपये ३७८.१०५ कोटी किंमतीचा प्रकल्प अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर सादर करण्यात आलेला आहे.

(३) भुसावळ नगरपरिषदमार्फत अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास सादर करण्यात मलनिस्सारण प्रकल्पात ३० द.ल.लि./दिन क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) व ३२१ किमी लांबीच्या भुयारी गटारींचा समावेश असून सदर प्रकल्प Sequential Batch Reactor (SBR) तंत्रज्ञानावर आधारित असणार आहे.
(४) व (५) भुसावळ नगरपरिषदेमार्फत केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर मलनिस्सारण प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून सदर प्रकल्प अमृत २.० अभियान अथवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

---

**भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील वरणगाव नगरपरिषद शहरातील विविध प्रभागातील स्वच्छतेबाबत**

**(२६) ५८६४३ (२४-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ (जि.जळगाव) तालुक्यातील वरणगाव नगरपरिषदेने शहरातील विविध प्रभागातील स्वच्छतेसाठी कचरा संकलन वाहने खरेदी केली असून, त्यातील बहुतांश वाहने नादुरुस्त झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात कचऱ्याचे ढिग साचल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे व त्यातच कचरा संकलन करणारी वाहने नादुरुस्त आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने कचरा संकलन वाहने तातडीने दुरुस्त करून कचरा उचलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे,
वरणगाव नगरपरिषदेमार्फत सन २०१७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ५ घंटा गाड्यांपैकी एका वाहनाचा माहे एप्रिल, २०२० मध्ये अपघात झाल्याने सदर वाहन बंद आहे. उर्वरित ४ वाहने सुस्थितीत कार्यान्वित आहेत.
(२) हे खरे नाही,
घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घनकचरा संकलनाचे काम कंत्राटी पद्धतीने देण्यात आलेले असून, सदर कंत्राटदारास ४ वाहने नगरपरिषदेकडून उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच कंत्राटदाराकडून स्वतःच्या एका वाहनाद्वारे घनकचरा संकलन करण्यात आले होते.
(३) व (४) वरणगाव शहरातील घनकचरा संकलनाकरीता माहे मे, २०२३ मध्ये नगरपरिषदेने २ अतिरिक्त घंटागाड्या खरेदी केल्या असून, सदर वाहने कंत्राटदारास उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सद्यस्थितीत नगरपरिषदेने कंत्राटदारास घनकचरा संकलनाकरीता एकूण ६ वाहने उपलब्ध करुन दिली आहेत. वरणगाव शहरातील सर्व प्रभागांमध्ये घनकचरा संकलनाचे काम नियमित सुरु आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुस्लिम समाजाचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी राज्य शासनामार्फत TISS या सामाजिक संस्थेची नियुक्ती केल्याबाबत

**(२७) ५८८४१ (२१-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी अभ्यासगट स्थापन करून सविस्तर पाहणी अहवाल सादर करण्यासाठी राज्य शासनामार्फत TISS या सामाजिक संस्थेची नियुक्ती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ५ महिन्यांचा कालवधी उलटूनही अदयापर्यंत त्या संस्थेला कार्यारंभ आदेश दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यारंभ आदेश देण्याबाबत लोकप्रतिनीधीनी दिनांक २ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा. उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाचे कारण काय आहे ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राज्यातील अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यासाठी राज्यातील ५६ मुस्लीमबहुल शहरातील सर्वेक्षणाचे काम टाटा समाज विज्ञान या शैक्षणिक संस्थेची निवड करण्याबाबत दिनांक २१ सप्टेंबर २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तथापि, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत शासन विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारावी, मुंबई येथील विविध विकास कामाच्या प्राप्त निधीवर आणलेली स्थगिती रद्द करणेबाबत

**(२८) ५९१६६ (२२-०४-२०२३). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी येथील विविध विकास कामाच्या प्राप्त निधीवर आणलेली स्थगिती रद्द करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०८-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) स्थगिती दिलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन योग्य तो निर्णय घेण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ(जि.सिंधुदुर्ग) नगरपंचायतीला अल्पसंख्यांक वस्तीच्या विकासकामाकरीता प्राप्त झालेला निधी खर्च करण्यास शासनाकडून स्थगिती दिल्याबाबत

**(२९) ५९३९२ (२२-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) नगरपंचायतीला अल्पसंख्यांक वस्तीच्या विकासासाठी शासनाकडून प्राप्त झालेला ५० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यास शासनाकडून स्थगिती देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्थगितीमुळे नगरपंचायतीतील अल्पसंख्यांक वस्तीमधील विविध विकास कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्यांक निधी खर्च करण्यास स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीच्या अनुषंगाने सदर अल्पसंख्याक वस्तीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०७-०८-२०२३) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये मंजूर विकास कामांपैकी ज्या विकास कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही किंवा सदर कामांचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला नाही, अशा कामांची सद्यस्थिती तपासून स्थगिती बाबत निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहरातील भुखंडाचे विनापरवानगी विभाजन झाल्याबाबत

**(३०) ५९४२५ (२६-०४-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळगाव (जि.जळगाव) सर्वे क्र.४१६/२अ व ४१६/२क मधील भुखंडाचे विनापरवानगी विभाजन झाल्याने अभिन्यास परवानगी मधील अटीचा भंग झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने अभिन्यास परवानगी रद्द करण्यास स्थगिती दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, महानगरपालिका जळगाव यांनी अद्याप सुनावणी घेऊन अभिन्यास परवानगी रद्द केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०८-२०२३) :** (१) नाही.

भुखंडाचे विभाजनास जिल्हाधिकारी, जळगांव यांनी बिनशेती परवानगी मंजुर केली आहे.

(२) नाही,

विषयांकीत प्रकरणी, संबंधीत जमिन मालक यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.६२३७/२०१९ दाखल केली असुन सदर याचिकेत मा. न्यायालयाने दि. ०३.०६.२०१९ रोजी जसे चे तसे (Status quo) आदेश दिलेले आहेत. सदर Status quo आज मितीस कायम आहेत.

(३), (४) व (५) प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## फूड डिलिव्हरी करणाऱ्या झोमॅटो, डोमिनोस व अन्य कंपन्यांच्या बाईक साठी विशेष रंगाच्या नंबर प्लेट व विशेष सिरीजचे नंबर देण्याबाबत

**(३१) ६००२४ (२४-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फूड डिलिव्हरी करणाऱ्या झोमॅटो,डोमिनोस व अन्य कंपन्यांच्या बाईकसाठी विशेष रंगाच्या नंबर प्लेट द्या किंवा विशेष सिरीजचे नंबर द्या जेणे करून काही घटना घडल्यास त्यांना ताबडतोब ओळखता येईल अशी सूचना मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय, आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) व (२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माजलगाव नगरपरिषद (जि.बीड) हद्दीतील मोकळ्या जागेवरील अतिक्रमण तातडीने निष्काषित करण्याबाबत

**(३२) ६००२९ (२२-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) नगरपरिषद हद्दीतील मोकळ्या जागेवरील अतिक्रमण तातडीने दुर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांच्याकडे दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मोकळया जागेवरील अतिक्रमणे निष्काषित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) माजलगाव नगरपरिषदेमधील मालमत्ता व बांधकाम विभागातील सर्व रेकॉर्ड जुन्या कालावधीत गहाळ झाले असल्याने, नगरपरिषदेमार्फत सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यात आले आहे. सद्यस्थितीमध्ये १६ खुल्या जागेचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. तथापि, संपुर्ण शहरातील सर्वेक्षणाचे काम पुर्ण झाल्यानंतर, खुल्या जागेवरील अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्याचे नगरपरिषद स्तरावर प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रामोशी बेरड, बेडर समाजास अनुसूचित जाती-जमातीच्या यादीत समाविष्ट करण्याबाबत

**(३३) ६०२६४ (२७-०४-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रामोशी बेरड, बेडर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापित करण्याची शासनाने घोषणा केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच या समाजाचा शासकीय पध्दतीने अभ्यास करुन केंद्र सरकारकडे या जमातीचा अनुसूचीत जाती- जमातीच्या यादीमध्ये समावेश करावा यासाठी शिफारस करण्याचेही जाहीर केले आहे हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर समाजास अनुसूचित जाती-जमातीच्या यादीत समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्यातील रामोशी, बेरड समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत शासनास निवेदन प्राप्त झाले होते. अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरिता निर्धारित केलेले निकष महाराष्ट्र राज्यातील बेरड, रामोशी, बेडर समाज पूर्ण करत नसल्याने बेरड, रामोशी, बेडर या समाजांचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत शिफारस करता येणार नाही, असे अभिप्राय आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी शासनास कळविलेले आहेत
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे शहरातील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(३४) ६०७१६ (११-०५-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने चार महिन्यांपासून प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिलदार नगर, अन्सार नगर यांना जोडणारा रस्ता मोहम्मदिया मज्जिद जवळील गल्ली, मुस्लिम नगर शाळा क्रमांक ५३ व ५४ च्या मागे मदरसा फलादारेनकडे जाणारा रस्ता, लोकमान्य हॉस्पिटल समोरील चाळीसगाव रोड लगतचा रस्ता या ठिकाणचे अतिक्रमण त्वरित हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदन प्राप्त होऊन देखील आयुक्त, महानगरपालिका धुळे यांनी टाळाटाळ केल्याने संबंधितांनी मा.न्यायालयाकडून तात्पुरता स्थगिती आदेश मिळविला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाकडे मागणी केल्याप्रमाणे अतिक्रमण हटविण्यात अपयशी ठरलेल्या आयुक्त, धुळे महानगरपालिका यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) दिलदार नगर, अन्सार नगर यांना जोडणारा रस्ता मोहम्मदिया मज्जिद जवळील गल्ली अतिक्रमणाबाबत मा.जिल्हा न्यायालय धुळे यांनी दिलेल्या स्थगन आदेश विरूद्ध महानगरपालिकेने एमसीए नं.१७/२०२३ अन्वये अपील दाखल केलेल असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तर, मुस्लिम नगर शाळा क्रमांक ५३ व ५४ च्या मागील अतिक्रमण दि.०१.०३.२०२३ रोजी तर लोकमान्य हॉस्पिटल समोरील चाळीसगाव रोड लगतचा रस्ता या ठिकाणचे अतिक्रमण दि.०४.०५.२०२३ रोजी निष्कासित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या सर्वागिण विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३५) ६०७२७ (११-०५-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोई-सुविधा व इतर विकासकामे करण्याकरीता सुमारे १० कोटी ९० लक्ष रुपयांचा निधी मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त महानगरपालिका अंतर्गत विविध प्रभाग यांच्या प्राथमिक मुलभूत सोई-सुविधा योजनेअंतर्गत सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने निधीबाबत अद्याप कोणती कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेच्या सर्वागिण विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर मनपास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात विविध विकास कामांसाठी रू. २०.९३५० कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक अमरधाम येथे स्वच्छतेचे काम करणाऱ्या मातंग समाजाच्या महिलांना मानधन देण्याबाबत**

**(३६) ६०७९२ (२४-०४-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरधाम (जि.नाशिक) येथील मातंग समाजाच्या महिला वंशपरंपरेने स्वच्छतेचे काम करीत असून, सदर महिलांना ओळखपत्र व मानधन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, नाशिक महानगरपालिका दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास शिफारस केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वर्षानुवर्षे अमरधाम येथे स्वच्छतेचे काम करणाऱ्या महिलांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कोणती करणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) निवेदनात उल्लेखित सदर महिला नाशिक पंचवटी विभागातील अमरधाम येथे वंशपरंपरेने कोणत्याही प्रकारे स्वच्छतेचे कामकाज करीत नाहीत.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नाशिक पूर्व व पंचवटी विभागातील अमरधाम येथे काही महिला स्वेच्छेने अमरधाममधील मृतदेहांचे अंत्यविधीनंतर दहनविधीतील रक्षेतून वस्तू शोधतात. तथापि, सदर महिला महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत नसल्याने मागणीबाबत कार्यवाही करता येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील कोल्ड स्टोरेजमध्ये मालाची साठवणूक करण्याची परवानगी असतांना सदर स्टोरेजचा वापर घाऊक बाजारासाठी केल्याबाबत**

**(३७) ६०८३३ (११-०५-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील कोल्ड स्टोरेजमध्ये मालाची फक्त साठवणूक करण्याची परवानगी असतानाही मागील वर्षापासून अफगाणीस्तानच्या व्यापाऱ्यांनी कोल्ड स्टोरेजचा वापर घाऊक बाजारासाठी केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे अहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एपीएमसीकडून अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०२-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती आवारात राज्यातून, इतर राज्यातून व परदेशातून शेतमाल/फळे आयात करणारे आयातदार हे त्यांच्याकडील विक्री न झालेला शेतमाल/फळे साठवणूकीसाठी खाजगी कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवतात. मार्च, २०२० मध्ये कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे बाजार समिती आवारात गर्दी टाळण्याच्या दृष्टीने आयातदारांनी खाजगी कोल्ड स्टोरेजमध्ये साठवणूक केलेला शेतमाल/ फळे त्या परिसरात परस्पर विक्री करण्याचा मार्ग अवलंबला होता. यामुळे बाजार समिती परिसरात शेतमाल/ फळांची आवक कमी झाल्यामुळे, दि फ्रंट ऑफ युनायटेड असोशिएशन यांनी खाजगी कोल्ड स्टोरेजमधून परस्पर चालू असलेला फळ विक्री व्यवसाय बंद करण्याबाबत दि.१८.०१.२०२२ रोजी शासनास निवेदन दिले होते.

(२) दि फ्रंट ऑफ युनायटेड असोशिएशन यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीने असोशिएशन व खाजगी कोल्ड स्टोरेजधारक यांच्या समवेत दि.२०.०१.२०२२ रोजी बैठक घेऊन कोल्ड स्टोरेजमधून होणारी फळांची विक्री तात्काळ बंद करण्याबाबत सूचना दिल्या होत्या व विशेष पथकामार्फत त्यांना भेटी देऊन अनधिकृत फळांची विक्री बंद केलेली आहे, असे सचिव, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी कळविले आहे.

(३) दि फ्रंट ऑफ युनायटेड असोशिएशन यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने, तत्कालीन मंत्री (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली व मंत्री (पणन व सहकार) यांच्या समवेत दि.२५.०१.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत कोल्ड स्टोरेजमधून अनधिकृतपणे होणाऱ्या फळ विक्री संदर्भात बाजार समितीने संबंधित कोल्ड स्टोरेज चालक व व्यापाऱ्यांना नोटीस देऊन कायदेशीर कारवाई करावी, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

तसेच, या विभागाच्या दि.१०.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये अनुज्ञप्ती नसलेले अनधिकृत घाऊक बाजार बंद करणेबाबत मंत्री (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय "आढावा समिती" व सचिव, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती यांच्या अध्यक्षतेखाली ८ सदस्यीय "अंमलबजावणी समिती" अशा २ समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत धाराशिव नगरपरिषद अंतर्गत प्रलंबित असलेल्या घरकुल बांधकामाबाबत**

**(३८) ६१२५१ (२४-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान घरकुल आवास योजनेअंतर्गत धाराशिव नगरपरिषदेला सन २०१८-१९ मध्ये ३ व माहे मार्च, २०२२ मध्ये २ असे एकूण ५ प्रकल्प अहवाल मंजूर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंतप्रधान घरकुल योजनेतर्गत १३०८ घरकुल मंजूर आहेत त्यापैकी ५०० घरकुलाचे काम सुरू असून उर्वरित घरकुलाची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरकुलाची कामे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने घरकुलाची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशतः खरे आहे.
प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १३०८ घरकुलांपैकी २८६ घरकुले कमी (Curtailment) झाली आहेत. उर्वरित १०२२ घरांपैकी ७५० घरांचे काम सुरु झाले असून त्यापैकी ३०० घरांचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच १२५ घरकुले कमी (Curtailment) करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. उर्वरित १४७ घरकुलांना बांधकाम परवाना देण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.
(३) १४७ घरकुल प्रलंबित असून, त्यापैकी काही लाभार्थ्यांच्या जागा वर्ग-२ मध्ये असल्याने व काही लाभार्थ्यांच्या अल्प प्रतिसादामुळे घरकुलांची कामे प्रलंबित आहेत. यासाठी नगरपरिषदेमार्फत बांधकाम परवाने देणे, वारंवार सूचना देणे, कॅम्पचे आयोजन करुन जनजागृती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी (जि. यवतमाळ) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करुन आर्थिक मोबदला देण्याबाबत**

**(३९) ६१३३४ (११-०५-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगांव (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील शेतजमिन वेकोली वणी नार्थव्दारे एकुण जमिनीच्या ९०% जमिन उकणी उपक्षेत्रासाठी अधिग्रहण करण्यात आली व उर्वरीत १०% जमिन (५० हे.आर) शिल्लक असून पिंपळगांव पुनर्वसन करिता भुमीअभिलेख विभागाचा सर्व्हे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावाचे पुनर्वसन झाल्यास उर्वरीत जमिन शेतकऱ्यांची करायची कशी तसेच ऑगस्ट व सप्टेंबर, २०२२ मध्ये झालेल्या महापुरामुळे शेतात पाणी शिरल्यामुळे पिंपळगांव व आसपासच्या गावातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे कुटूंबावर उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच सर्व शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहीत करुन शासनाच्या निकषानुसार त्यांना आर्थिक मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
वणी ( जि. यवतमाळ) तालुक्यातील ३७८.५५ हे शेतजमिन उकणी उपक्षेत्रासाठी संपादित केली आहे. उर्वरित ४२ ते ४३ हेक्टर जमिन वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी नॉर्थ ( भारत सरकार पुरस्कृत उपक्रम) व्दारे संपादित करण्यात आलेल्या नाहीत.मौजा पिंपळगांव या गावाचे पुनर्वसन कोल बेअरिंग ॲक्ट- १९५७ अन्वये प्रस्तावित आहे.त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड सोबत बैठक आयोजित करुन मौजा पिंपळगांव या गावाच्या पुनर्वसनाबाबत निर्देश दिले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) माहे ऑगष्ट व सप्टेंबर २०२२ मध्ये वर्धा नदीला आलेल्या महापुरामुळे पिंपळगांव येथील नुकसान झालेल्या ५२ शेतक-यांच्या शेतपिकांचे पंचनामे करुन शासन निर्णय महसुल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक / सिएलएस-२०२२/प्र.क्र.२९७/म-३ दिनांक ०८.०९.२०२२ अन्वये १३२४३६८/- रुपये अनुदान देण्यात आले आहे. तसेच ४८

तासापेक्षा अधिक कालावधीकरीता घरात पाणी शिरलेल्या व घरातील कपडे भांडी / घरगुती वस्तुकरिता अर्थसहाय म्हणुन पिपळगांव येथील ९ कुटूंबाना सानुग्रह अनुदान त्याचवेळी तात्काळ देण्यात आले आहे तसेच तालुक्यातील नदीकाठच्या गावामध्ये शेतपिकांचे नुकसान झाले होते त्यांना सुध्दा शासन निर्णयाप्रमाणे अनुदान देण्यात आले आहे. परंतु मौजा. पिंपळगांव येथील स्थानीक ग्रामपंचायत व स्थानीक लोक प्रतिनिधी व या कार्यालयाने वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी नॉर्थ (भारत सरकार पुरस्कृत उपक्रम) प्रशासनासोबत सभा घेऊन वेळोवेळी उर्वरीत जमिन घेण्यासंदर्भात विचारणा केली असता वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी नॉर्थ (भारत सरकार पुरस्कृत उपक्रम) प्रशासनाने मौजा पिंपळगांव येथील शेतक-यांची उर्वरित शेती वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी नॉर्थ (भारत सरकार पुरस्कृत उपक्रम) यांना अधीग्रहण करणे शक्य नाही कारण प्रकल्प अहवाल (Project Report) मध्ये उल्लेखीत केलेल्या जमिनीचे केवळ अधीग्रहण कोल बेअरिंग अॅक्ट १९५७ नुसार केल्या जाते. प्रकल्प अहवाल (Project Report) च्या बाहेरील जमिन विकत घेण्याचा अधिकार वेस्टर्न कोल फिल्ड लिमिटेड वणी नॉर्थ (भारत सरकार पुरस्कृत उपक्रम) यांना नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कांबारा आणि गोठेघर (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाजवळील कांबारे पॉवर हाऊस येथील नदीवरील पूलाच्या संरक्षक कठड्याची दूरुस्ती करण्याबाबत

**(४०) ६१३७७ (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांबारा आणि गोठेघर (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाजवळील कांबारे पॉवर हाऊस येथील नदीवरील पूलाचा संरक्षक कठडा तुटला असल्याने त्याची दुरुस्ती करण्याची मागणी प्रशासनाकडे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संरक्षक कठडा तातडीने दुरुस्त करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (३१-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे-गोठेघर, कांबारे गावनजिक कांबारे पॉवर हाउस जवळील नदीवरील पूलाचा संरक्षक कठडा नव्याने बसवण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केटयार्ड येथील बांबू मार्केटच्या जागेमधील पार्किंगमध्ये शुल्क आकारुन वाहनचालकांची लूट करण्यात येत असल्याबाबत

**(४१) ६१६४९ (११-०५-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केटयार्ड येथील बांबू मार्केटच्या जागेमधील पार्किंगमध्ये शुल्क आकारणे व वाहनचालकांची लूट करण्यात येत असल्याची बाब दिनांक ८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित पार्किंग कंत्राटदारांची मुदत संपून दीड वर्ष उलटल्यानंतर आजतागायत करार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटराविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२५-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील नियोजित फूल मार्केट समोरील स.नं. ५५९अ / २/ २ मधील ३.३२ एकर मोकळया जागेवर वाहनतळ पार्किंग चालविणे कामाचा ठेका ई-निविदेतील नियम व अटी / शर्तींचे अधिन राहून दिनांक ११/०७/२०२० ते १०/०७/२०२१ या एक वर्ष कालावधीकरिता रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टीम्स प्रा. लि. यांना बाजार समितीतर्फे देण्यात आलेला होता. सदर पार्किंग ठेक्याचा मुदत संपल्यानंतर बाजार समितीला आवश्यक वाटल्यास पर्यायी व्यवस्था होईपर्यंत या निविदेतील दराप्रमाणेच वाहनतळ ठेक्याचे कामकाज चालू ठेवावे लागेल,अशी करारनामा मधील तरतूद आहे.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात व कोरोना परिस्थितीत ठेकेदारांना सवलत देणे, भाडे कमी करून मुदतवाढ देणेबाबतच्या वित्त विभाग दि. २९ जुलै, २०२० च्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ सप्टेंबर २०२१ पासून पुढील कालावधीसाठी मुदत वाढवून द्यावी अशी रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स प्रा. लि. यांनी बाजार समितीकडे विनंती केलेली होती.

वित्त विभागाच्या दि. २९ जुलै, २०२० च्या शासन निर्णयानुसार रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्डसिस्टीम्स प्रा. लि. हे सद्यस्थितीत वाहनतळ चालविणेचे कामकाज पाहण्याकरिता मुदतवाढ दिली आहे. सदर जागेवर वाहनतळ पार्किंग चालविणे कामाचा ठेका देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत ई-निविदा प्रसिद्ध केले आहे.नवीन निर्वाचित संचालक मंडळापुढे सदर बाब प्रलंबित आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील ता.पेण मधील गावांमध्ये पाणी टंचाई दुर करण्यासाठी सिमेंट बंधारे बांधण्याबाबत

**(४२) ६१८८७ (०८-०५-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बळवली, आंबिवली, वरप, कोंडवी, पाबळ, जीर्णे, कुरनाड, जांबोशी व कार्ली (ता.पेण, जि.रायगड) या गावांमध्ये सिमेंट बंधारे झाल्यास फळबाग लागवड, भाजीपाला क्षेत्राची वाढ, तसेच पाणी टंचाई दुर होऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावामध्ये सिमेंट बंधारे बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१७ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास कृषी मंत्री यांनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०८-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदरचे पत्र या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) पेण तालुक्यात सिमेंट बंधाऱ्याची कामे या विभागाकडून करण्यात आलेली नाहीत. परंतू मा.लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार तांत्रिक दृष्ट्या व शासनाचे निकषामध्ये सफल होणाऱ्या को.प.बंधारे इत्यादी योजनांची भविष्यात निधी उपलब्धतेनुसार कामे करण्याचे या विभागाचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

वि.स. १९० (27)

## पुणे बाजार समितीच्या प्रस्तावित अद्ययावत बाजार उभारणीसाठी ठेवेलेला भुखंड भाडेतत्वावर देण्यात आल्याबाबत

**(४३) ६२१५७ (११-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे बाजार समितीने प्रस्तावित अद्ययावत बाजार उभारणीसाठी ठेवेलेला सुमारे १०० कोटी रुपयांचा भुखंड काही विशिष्ट आडत्यांच्या गटाला तुटपुंज्या भाडेतत्वावर दिल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या पणन संचालकांनी जिल्हा उप निबंधक यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्याचा तपशील काय,

(४) असल्यास, चौकशी काय आढळून आले आहे व त्या अनुषंगाने संबधित दोषी व्यक्तींवर कोणत्या स्वरुपाची कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कृषि उत्पन्न बाजार समिती पुणेच्या मुख्य बाजार आवारातील जमीनीचे बाजार समितीने शासनाचे माध्यमातून भूसंपादन केलेले आहे. सर्व्हे नं. ५५९/अ/२, ब/२ या जागेमधील प्रस्तावीत डाळींब यार्डचे प्रत्येकी १२५० चौ. फुटाचे मोकळया जागेचे वाटप १८ आडत्यानां बाजार समितीने त्यांचेसोबत लिव्ह अँड लायसन्स करार केलेला आहे.

(२) हे खरे आहे.

लिव्ह अँड लायसेन्स तत्वावर करुन पणन संचालक यांच्या मान्यतेसाठी बाजार समिती ने प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे ग्रामीण या कार्यालयास सादर केला आहे.

दि. २४.०२.२०२३ रोजी महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी व विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० व नियम ११७ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांची नियुक्ती केलेली होती.

(३) व (४) प्राधिकृत चौकशी अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांचेकडील दि.१६.०३.२०२३ रोजीचा चौकशी अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) मार्फत दि. २०.०३.२०२३ रोजी पणन संचालनालय,पुणे येथे प्राप्त झालेला होता. सदर अहवाल पुढील उचित कार्यवाहीसाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविण्यात आला आहे.

सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना दि. २५.०३.२०२३ चे आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित केलेले आहे. तथापी सदर निलंबन आदेशाविरुध्द त्यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे दावा क्र. ३६२/२०२३ दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मा. न्यायाधिकरण यांनी दि. २७.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनाकडील दि. २३.०३.२०२३ रोजीचे तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांच्या निलंबनाचे आदेश रद्दबातल केले आहेत व अपिलकर्ता यांना आदेशाच्या तारखेपासून दोन आठवडयाच्या आत शासन सेवेत पदस्थापना देणेबाबत आदेशित केलेले आहे.

शासन परिपत्रक दि. २४/०५/२०२३ रोजीच्या आदेशानुसार तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांना उपसंचालक (पणन), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे पदस्थापना दिलेली आहे.

उपरोक्त नमुद पुणे बाजार समितीच्या अनियमित कामकाजाबाबत जि.वि.ले.प वर्ग-१, सहकारी संस्था, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करणेसाठी दि. १०.०५.२०२३ रोजीच्या पत्राने प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील पेण तालुक्यातील तलावांचे राज्य सरोवर व संवर्धन विकास योजनेंतर्गत सुशोभिकरण करण्याबाबत**

**(४४) ६२४४२ (२५-०४-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील पेण तालुक्यात तलावांची संख्या मोठया प्रमाणात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरोवर व संवर्धन विकास योजनेंतर्गत तलावांचे संवर्धन व सुशोभिकरण केल्यास स्वच्छता निर्माण होवून आजुबाजूस असलेल्या स्थानिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास व पर्यटन क्षेत्र निर्माण होण्यास तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासदेखील मदत होईल, हे खरें आहे काय,

(३) असल्यास, पेण तालुक्यातील एकूण ४० तलावांचे राज्य सरोवर व संवर्धन योजनेंतर्गत संवर्धन व सुशोभिकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रधान सचिव, राज्य सरोवर व संवर्धन, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांना आवश्यक निधी उपलब्ध करणेबाबतचे निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार मोठया प्रमाणावर लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागून पर्यटन निर्माण होवून रोजगार निर्माण करण्यासाठी शासनस्तरावर निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०८-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) लोकप्रतिनिधी यांचे दि.०६ फेंब्रुवारी, २०२३ रोजीचे पत्र पर्यावरण विभागास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांना राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार विहित नमून्यातील प्रस्ताव सादर करणेबाबत दि.१८.०४.२०२३ रोजी पत्र निर्गमित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली नगरपरिषदेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४५) ६२६४० (२४-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्याची वाढती लोकसंख्या व विस्तार लक्षात घेता पाणीपुरवठ्याची दरवर्षी वाढ नोंदविले जाते ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार गडचिरोली नगरपरिषदेद्वारा तयार करण्यात आलेला ४४.७६ कोटी रुपयांच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने गडचिरोली नगरपरिषदेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या ४४.७६ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गडचिरोली नगरपरिषदेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या रुपये ४४.७५ कोटीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर गडचिरोली नगरपरिषदेमार्फत सादर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) गडचिरोली नगरपरिषदेचा पाणीपुरवठा प्रकल्प अमृत २.० अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या मा. मुख्य

सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समिती अथवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीसमोर सादर करण्यात येईल.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या जमिनीच्या विक्री व्यवहाराबाबत**

**(४६) ६३१३४ (११-०५-२०२३). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद कृषि उत्पन्न बाजार समितीच्या जमिनीचे विक्री व्यवहार प्रशासक असतांना जिल्हा उप निबंधक (D.D.R.) यांनी केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासकला असे खरेदी-विक्रीचे अधिकार आहे काय, असल्यास त्यांनी पणन संचालकाची परवानगी घेतली होती काय,

(३) असल्यास, या विक्री व्यवहारातून कृषि उत्पन्न बाजार समितीचे ४ ते ५ कोटी रुपयाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्याकडून झालेल्या नुकसानीची वसुली करुन कृषि उत्पन्न बाजार समितीला मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०२-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तत्कालीन अशासकीय प्रशासक मंडळाने प्रत्यक्ष विक्रीचा व्यवहार केलेला आहे. जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद तथा प्रशासक, उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद यांनी विक्रीचा व्यवहार केलेला नाही.

(२) प्रशासक यांनी विक्री केली नाही, त्यामुळे त्यांच्या खरेदी-विक्रीच्या अधिकाराबाबत प्रश्न उद्भवत नाही. दिनांक २२.०५.२०१२ रोजी जागा विक्रीबाबत कृषि उत्पन्न बाजार समितीला कृषि पणन मंडळाने मंजुरी दिली होती. त्यावेळी महाराष्ट्र खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२(१) चे अधिकार कृषि पणन मंडळास होते. त्यामुळे पणन संचालकांच्या मंजुरीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी सदर जागा कृषि पणन मंडळाने रुपये १२.९९ कोटी मध्ये कायमस्वरुपी विक्री करण्यासाठी दिनांक २२.०५.२०१२ रोजी परवानगी दिली होती. त्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समिती, औरंगाबाद यांनी सन २०१५-१६ ला २१.०० कोटी राखीव किंमत ठेवुन निविदा प्रसिध्द केली होती. श्री. सय्यद अनवर यांची रुपये २१.७१ कोटीची सर्वोच्च निवीदा अंतिम करण्यात आली होती.

श्री. अनवर यांनी पुर्ण रक्कम न भरल्याने सदरचा व्यवहार रद्द करुन बाजार समितीने नव्याने २१.०० कोटी राखीव किंमत ठेवुन निविदा प्रसिध्द केली होती.

सुधारीत दि.०६.०५.२०१९ च्या निविदेनुसार मे.शौर्य असोसिएटस यांची रुपये २१.७५ कोटीची सर्वोच्च निवीदा अंतिम करण्यात आली. त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती,औरंगाबाद यांच्यासोबतच्या व्यवहारात एकुण- रक्कम रु.६,०६,४४,६०४/- धनादेश अनादर झालेले आहे. त्यामुळे प्रशासक यांनी विक्रीचा व्यवहार रद्द करण्याबाबतची मे. शौर्य असोसिएटस यांना नोटीस दिली होती. सदर नोटीस विरुध्द मे. शौर्य असोसिटस यांनी मा. दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. मा. दिवाणी न्यायालयाने प्रशासकाचे नोटीसला जैसे थे (Status Quo)चे आदेश पारित केले आहेत.

तद्नंतर बाजार समितीची निवडणुक होवुन नवनिर्वाचीत संचालक मंडळ अस्तित्वात येवुन दिनांक ०९.०६.२०२३ रोजीच्या मासिक सभेमध्ये सदरचा विषय चर्चाकरीता ठेवुन मे. शौर्य असोसिएटस यांनी अनादर झालेल्या चेकच्या रकमा रुपये ६.६ कोटी बँकेच्या व्याजदरानुसार जमा करणेकरीता दोन महिन्याचा कालावधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे धनादेश अनादर झाल्याबाबत अजमितीस बाजार समितीचे नुकसान झाले आहे किंवा कसे हे निश्चितपणे सांगता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मृद व जलसंधारण विभागातील समावेशन रद्द करणे बाबत**

**(४७) ६३१३८ (२५-०४-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलसंधारण विभागाच्या दिनांक ४ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयामुळे जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे होणारे समावेशन बंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे समावेशन बंद असतानाही दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुन्हा समावेशन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात समावेशन करताना जलसंपदा विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतले होते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ३० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णय मूळ शासन आदेशाचे उल्लंघन करीत असून संबंधित शासन निर्णय रद्द करून संबंधित प्रतिनियुक्तीवर असलेल्या आठ अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ सेवा जलसंपदा विभागाकडे तात्काळ प्रत्यार्पित करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुंषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१४-०७-२०२३) :** (१) होय.

(२) होय, परंतु या शासन निर्णयान्वये करण्यात आलेले समावेशन हे दि.०४/०९/२०१९ पूर्वी आलेल्या व प्रलंबित असलेल्या समावेशन अर्जासंदर्भातील आहे.

(३) मृद व जलसंधारण विभागाच्या दि.०४/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलसंपदा विभागाकडून मृद व जलसंधारण विभागाकडे होणारी समावेशन प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. तथापि, यापूर्वी शासनाकडे प्राप्त असलेल्या प्रलंबित अर्जांवर शासन निर्णय दि.३०/११/२०२२ अनुसार निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दिनांक २५/०४/२०१७ रोजीच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील धोरणात्मक निर्णयानुसार व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या दि.३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.८ (vi) मधील तरतुदीनुसार, संबंधित अधिकाऱ्यांचे मृद व जलसंधारण विभागाकडे शासन निर्णय दि.३०/११/२०२२ अन्वये समावेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याबरोबरच विभागाच्या दि.३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार मृद व जलसंधारण विभागात समावेशन करण्यासाठी जलसंपदा विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची तरतूद नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातंर्गत येणाऱ्या नवी मुंबई विभागात मोटार वाहन कर आकारणीत केलेला गैरव्यवहार**

**(४८) ६३८३६ (२५-०४-२०२३). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातंर्गत येणाऱ्या नवी मुंबई विभागात मोटार वाहन कर आकारणीत गैरव्यवहार करणाऱ्या ९ अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश उप लोकायुक्तांनी दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास परिवहन विभागास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०८-२०२३) :** (१), (२), व (३) श्री. शरद धुमाळ यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने मा. उप लोकायुक्त यांनी दिनांक ०२.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांची वैयक्तिक सुनावणी घेण्याचे परिवहन आयुक्त यांना कळविले आहे. तथापि, माहे मार्च, २०१९ च्या सुमारास परिवहन आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त निनावी तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशी येथील एकूण ८५० वाहने आक्षेपित करण्यात आली आहेत. सदर प्रकरणी प्राथमिकदृष्ट्या अनियमितता निदर्शनास आल्याने एकूण ९ अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द परिवहन आयुक्त यांच्या स्तरावरुन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९८१ च्या नियम ८ नुसार एकत्रित विभागीय चौकशी सुरु केली आहे. या प्रकरणी चौकशी अधिकारी यांनी दिनांक ०७.११.२०२२ अन्वये चौकशीचा अहवाल परिवहन आयुक्त कार्यालयास सादर केला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

---

## शीख आणि बौध्द हे दोन धर्म सोडून अन्य धर्म स्विकारणाऱ्या दलित समुदायांना अनुसूचित जातीचा (एससी) दर्जा मिळण्याकरीता आयोग स्थापन करण्याबाबत

**(४९) ६४०११ (२५-०४-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शीख आणि बौध्द हे दोन धर्म सोडून अन्य धर्म स्विकारणाऱ्या दलित समुदायांना अनुसूचित जातीचा (एस.सी) दर्जा देण्याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने तीन सदस्य आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोगामार्फत कोणत्या मुद्दांबाबत सखोल अभ्यास करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार आयोगाने दिलेल्या शिफारशी लागु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) ज्या व्यक्ती ऐतिहासिकदृष्ट्या अनुसूचित जातीचे आहेत, तथापि त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४१ अंतर्गत वेळोवेळी जारी केलेल्या राष्ट्रपतींच्या आदेशात नमूद केलेल्या धर्मांव्यतिरिक्त अन्य धर्मात धर्मांतर केले आहे, अशा अनुसूचित जातीच्या व्यक्तींच्या सद्य:स्थितीची सर्वंकष तपासणी करण्यात येणार आहे.

(३) सदर चौकशी आयोगाकडून राज्यशासनाकडे अद्यापपर्यंत कोणत्याही माहिती/अहवालाची मागणी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ शहरातील नगरपालिकांची त्रिसदस्यीस समितीने केलेल्या चौकशीबाबत

**(५०) ६४५५५ (१२-०५-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहर नगरपालिकेच्या विविध गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाने सन २०२२ मध्ये जिल्ह्यातील जिल्हा प्रशासन अधिकारी व नगरपालिका यांच्या नेतृत्वात त्रिसदस्यीय समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लक्षवेधी सभागृहात उपस्थित झाल्यानंतर जिल्हा प्रशासनीय अधिकारी यांनी चौकशीविना अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने गैरव्यवहाराची चौकशी करतांना मूळ तक्रारदार यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेतले नसल्याने, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजी जिल्हा प्रशासनिक अधिकारी यांनी दिलेल्या अहवालाबाबत तक्रारदार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे आपली तक्रार ई-मेल द्वारे नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी या समिती अहवालाची संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या दि.२३ मार्च, २०२२ रोजीच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.
(३) हे खरे नाही.
जिल्हा प्रशासन अधिकारी, जळगाव यांनी दि.२८ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये अर्जदार यांना सदर प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासंदर्भात आवश्यक कागदपत्र समितीस सादर करण्याबाबत कळविले होते.
(४) सदर प्रकरणी चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. यानुसार, भुसावळ नगरपालिका अंतर्गत सुरु असलेल्या विविध विकास कामांचे नगरपरिषद स्तरावर उपलब्ध असलेल्या अभिलेखाची तपासणी, तसेच निवडक कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता, सदरची कामे योग्य असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.